# प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय

वनभवन, रामगिरी रोड, पोलिस जिमखाना शेजारी, सिव्हील लाईन्स, नागपूर- ४४० ००१

**ई-मेल**

क्र. कक्ष-१०(२)/आस्था/एक/प्र.क्र.६(२२-२३)/भाग-२/ ९५४०
नागपूर ४४०००१, दिनांक - ०२/०२/२०२३

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (प्रा.) सर्व
वनसंरक्षक (प्रा.) सर्व

**विषय :** वनविभागातील नामनिर्देशनाच्या कोट्यातील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड या संवर्गातील भरतीबाबत

**संदर्भ :-**
१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दिनांक ४/५/२०२२
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रानिमं १२२२/प्र.क्र.१३६/ का.१३-अ, दिनांक २१/११/२०२२
३) शासन, महसूल व वनविभाग शासन पत्र क्र. एफएसटी-०६/२२/प्र.क्र.१२८ /फ-४, दिनांक २७/१२/२०२२ (गट-ब, अराजपत्रित, गट-क व ड बाबत)
४) शासन, महसूल व वनविभाग शासन पत्र क्र. एफएसटी-०६/२२/प्र.क्र.१२८ /फ-४, दिनांक २७/१२/२०२२ (वनरक्षक बाबत)
५) शासन, महसूल व वनविभाग शासन पत्र क्र. एफएसटी-०६/२२/प्र.क्र.१२८ /फ-४, दिनांक ३१/१/२०२३
६) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र.४२७/१६-ब, दिनांक १/२/२०२३

वनविभागातील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) नामनिर्देशनाच्या कोट्यातील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड संवर्गातील पदे सरळसेवेने भरण्याबाबत एकत्रित मार्गदर्शक सूचना महसूल व वनविभाग शासन निर्णय दिनांक २७/१२/२०२२ (संदर्भ ३) अन्वये निर्गमित केलेल्या आहेत. तसेच वनरक्षक भरतीबाबत वेगळ्याने कार्यपध्दती महसूल व वनविभाग शासन निर्णय दिनांक २७/१२/२०२२ (संदर्भ ४) अन्वये ठरवून दिली आहे.

२. सरळसेवेने भरती करावयाच्या पदांच्या सेवाप्रवेश नियमासंदर्भात या कार्यालयाकडून शासनास संद्रभ करण्यात आला होता. त्या अनुषंगाने शासनाने पत्र दिनांक ३१/०१/२०२३ अन्वये (प्रत संलग्न) एकूण २८ संवर्गाचे बाबतीत मार्गदर्शक सुचना प्राप्त झालेल्या आहे. त्यानुसार अनुक्रमांक १ ते १९ नुसार खालीलप्रमाणे कळविले आहे.

| अ. क्र | पदनाम | दिनांक ३१/१/२०२३ चे शासन पत्रान्वये प्राप्त सुचनेनुसार करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | लघुलेखक उच्चश्रेणी अ.रा. गट-ब | सर्व संवर्गाच्या बिंदुनामावली प्रमाणित, टीसीएस कंपनीसोबत करार झाल्यानंतर जाहीरात प्रसिध्दीबाबत कार्यवाही करण्यात यावी. |
| २ | लघुलेखक निम्नश्रेणी अ.रा. गट-ब | |
| ३ | वरिष्ठ सांख्यिकी सहायक गट-क | |
| ४ | कनिष्ठ सांख्यिकी सहायक गट-क | |
| ५ | लेखापाल गट-क | |
| ६ | शिपाई गट -ड | |

| अ. क्र | पदनाम | दिनांक ३१/१/२०२३ चे शासन पत्रान्वये प्राप्त सुचनेनुसार करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| ७ | वनरक्षक गट-क | मा. राज्यपाल यांच्या दिनांक २९/८/२०१९ च्या अधिसुचनेनुसार अनुसुचित क्षेत्रातील वनरक्षक व सर्व्हेक्षक पदे भरण्यासंदर्भात धोरणात्मक प्रस्ताव विचाराधिन असल्याने तुर्तास अनुसुचित क्षेत्रातील पदे वगळता इतर ठिकाणची पदे भरण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्यात यावी, अशा सुचना शासनाने दिनांक ३१/३/२०२३ अन्वये दिल्या आहेत. [*तथापी आता सा.प्र.वि. शासन निर्णय दि. १/२/२०२३ अन्वये मा. राज्यपाल महोदयांच्या दि. २९/८/२०१९ चे अधिसूचनेचे अनुषंगाने अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) मधील १७ संवर्गातील पदांच्या भरतीबाबत सविस्तर सुचना निर्गमित केलेल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करावी.* ] |
| ८ | सर्व्हेक्षक गट-क | |
| ९ | कनिष्ठ अभियंता गट-ब अराजपत्रित | यापुर्वी या संवर्गाची भरती सा.बां.वि.च्या दिनांक १/१/१९९८ च्या सेवाप्रवेश नियमानुसार करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर सेवाप्रवेश नियमाच्या आधारे भरतीप्रक्रिया राबविण्यात यावी. |
| १० | ट्रक चालक गट-क | सा.प्र.विभागाच्या दिनांक २/३/२०१७ रोजीच्या सेवाप्रवेश नियमानुसार भरतीप्रक्रिया राबविण्यात यावी. तथापी उमेदवाराने जड प्रवासी वाहन चालविण्याचा परवाना सुध्दा धारण करणे अनिवार्य करण्यात यावे. |
| ११ | गृह प्रमुख गट-क | या संवर्गाची भरती प्रक्रिया आतापर्यंत ज्या आधारे केली जात आहे, त्या आधारे राबविण्यात यावी. |
| १२ | लॉंच चालक गट-क | |
| १३ | ग्रंथालय परिचर गट –क | |
| १४ | पशु परिचर गट –क | |
| १५ | खलाशी गट –ड | |
| १६ | पहारेकरी गट- ड | |
| १७ | सहायक स्वयंपाकी गट -ड | |
| १८ | चेनमन गट -ड | |
| १९ | नौका तांडेल गट-ड | |

५. या व्यतिरिक्त माहुत, चाराकटर, शारीरिक प्रशिक्षण ड्रील शिक्षक, बिनतारी संदेश चालक, बिनतारी तंत्रज्ञ, तांडेल, कवायत शिक्षक, मास्क लश्कर व देखभाल सेवक या संवर्गाचे सेवाप्रवेश नियम प्रसिध्द झाल्यानंतर भरती प्रक्रिया राबविणेबाबत शासनाने पत्र दिनांक ३१/०१/२०२३ अन्वये कळविले आहे.

६. सा.प्र.वि. शासन निर्णय दि. १/२/२०२३ अन्वये मा. राज्यपाल महोदयांच्या दि. २९/८/२०१९ चे अधिसूचनेचे अनुषंगाने अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) मधील १७ संवर्गातील पदांच्या भरतीबाबत सविस्तर सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

७.	वनविभागातील एकूण पदांपैकी गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड मधील कोणत्या पदाची भरती कोणती समिती करेल, याबाबत सविस्तर यादी महसूल व वनविभाग शासन निर्णय दिनांक २७/१२/२०२२ (संदर्भ ३) मध्ये नमुद केली आहे. सदर शासन निर्णय, शासन पत्र दिनांक ३१/१/२०२३ व सा.प्र.वि. शासन निर्णय दिनांक १/२/२०२३ मधील सुचना यांचा एकत्रित विचार करुन भरती प्रक्रियेबाबत खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहे.

| अ क्र | समिती | समितीकडून भरण्यात येणारी पदे | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षते खालील जिल्हास्तरीय समिती | **गट-क** :- गृहप्रमुख, माहूत, लॉच चालक, ट्रक चालक, कवायत शिक्षक, ग्रंथालय परिचर, पशु परिचर<br><br>**गट-ड** :- शिपाई, चेनमॅन, चारा कापणारा, खलाशी, नौका तांडेल, मॉश्क लश्कर, तांडेल, पहारेकरी, देखभाल सेवक व सहाय्यक स्वयंपाकी | **गट-क मधील** ट्रक चालक, गृहप्रमुख, लॉच चालक, ग्रंथालय परिचर, पशु परिचर व **गट-ड मधील** शिपाई, खलाशी, पहारेकरी, सहाय्यक स्वयंपाकी, चेनमॅन, नौका तांडेल या पदांबाबत शासन पत्र दिनांक ३१/१/२०२३ मधील सुचनांनुसार भरती प्रक्रिया राबवावी व प्रचलित सामाजिक व समांतर आरक्षण विचारात घेऊन मागणीपत्र तात्काळ जिल्हास्तरीय समितीकडे सादर करावे व तसे या कार्यालयास अवगत करावे. ही कार्यवाही ६/२/२०२३ पर्यंत पूर्ण करावी.<br><br>**गट-क मधील** माहूत, कवायत शिक्षक व **गट-ड मधील** चारा कापणारा, मॉश्क लश्कर, तांडेल , देखभाल सेवक या पदांची भरती प्रक्रिया ही सदर संवर्गाचे सेवाप्रवेश नियम प्रसिध्द झाल्यानंतर राबवावी. |
| २ | मुख्य वनसंरक्षक (प्रा.) / वनसंरक्षक (प्रा.) यांचे अध्यक्षतेखालील प्रादेशिक निवड समिती | **गट-क** :- लेखापाल, सर्व्हेक्षक, शारीरिक प्रशिक्षण ड्रील शिक्षक, वन निरिक्षक, बिनतारी संदेश चालक व बिनतारी तंत्रज्ञ, वनरक्षक | शारीरिक प्रशिक्षण ड्रील शिक्षक, बिनतारी संदेश चालक व बिनतारी तंत्रज्ञ या पदांची भरती प्रक्रिया ही सदर संवर्गाचे सेवाप्रवेश नियम प्रसिध्द झाल्यानंतर राबवावी.<br><br>वन निरिक्षक हे पद संपुष्टात आले असल्याने सदर पदाची भरती प्रक्रिया राबविणेची आवश्यकता नाही.<br><br>सा.प्र.वि. शासन निर्णय दि. १/२/२०२३ मध्ये सर्व्हेक्षक हे पद वनविभागाशी निगडीत दर्शविलेले नाही. त्यामुळे मा. राज्यपाल यांची दि. २९/८/२०१९ ची अधिसूचना वनविभागातील सर्व्हेक्षकास लागू आहे किंवा कसे, याबाबत शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात येत आहे. शासनाकडून सूचना प्राप्त झाल्यानंतर सर्व्हेक्षक पदाबाबत आपणास कळविण्यात येईल.<br><br>सा.प्र.वि. शासन निर्णय दि. १/२/२०२३ |

| अ क्र | समिती | समितीकडून भरण्यात येणारी पदे | करावयाची कार्यवाही |
| --- | --- | --- | --- |
| | | | मधील तरतूदीनुसार वनरक्षकांची अनुसूचित क्षेत्रातील पदे व बिगर अनुसूचित क्षेत्रातील पदे निश्चित करण्यात यावीत व त्यानुसार बिंदूनामावली प्रमाणित करुन घेऊन पदांचे मागणीपत्र सोबतचे विवरणपत्रात **वनविभागनिहाय** या कार्यालयास सादर करावे. तसेच सर्व वनविभाग मिळून **वनवृत्ताचा एकत्रित गोषवारा** सादर करावा.<br><br>लेखापाल पदाचे मागणीपत्र या कार्यालयाने पत्र क्र. २९१, दिनांक १/२/२०२३ अन्वये ठरवून दिलेल्या विवरणपत्रात या कार्यालयास सादर करावा. |

वरीलप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल वेळोवेळी सद्यास्थितीसह या कार्यालयास सादर करावा.

**सहपत्र** :- वरीलप्रमाणे

**(शोमीता बिश्वास)**
**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक**
**(प्रशासन-दुय्यम संवर्ग)**

**प्रतिलिपी (ई-मेलद्वारे)** :- प्रधान सचिव (वने), महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सादर.

**प्रतिलिपी (ई-मेलद्वारे)** :- प्रशासकीय अधिकारी, कक्ष-१३ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

**प्रतिलिपी (ई-मेलद्वारे)** :- कक्ष अधिकारी, कक्ष-७ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित. त्यांनी राज्यस्तरीय पदांबाबत भरती प्रक्रिया राबविणेचे दृष्टीने आवश्यक कार्यवाही करावी.

## वनरक्षक पदाचे मागणीपत्र

### वनविभागाचे नाव --------

१. (बिगर अनुसूचित क्षेत्र )

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | विजा-(अ) | भ.ज.-(ब) | भ.ज.-(क) | भ.ज.-(ड) | इ.मा.व | वि.मा.प्र. | आ.दु.घ. | अराखिव पदे | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | | | | | | | | | | | |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षण विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | | | | | | | | | | | |
| महिला | | | | | | | | | | | |
| खेळाडू | | | | | | | | | | | |
| माजी सैनिक | | | | | | | | | | | |
| पदवीधर अंशकालीन कर्मचारी | | | | | | | | | | | |
| भूकंपग्रस्त | | | | | | | | | | | |
| प्रकल्पग्रस्त | | | | | | | | | | | |
| रोजंदारी मजूर | | | | | | | | | | | |
| होमगार्ड | | | | | | | | | | | |
| अनाथ | | | | | | | | | | | |

२. (अनुसूचित क्षेत्र- जिल्हा------ )

| अ.क्र. | प्रवर्ग | सर्व साधारण | महिला | खेळाडू | माजी सैनिक | पदवीधर अंशकालीन कर्मचारी | भूकंपग्रस्त | प्रकल्पग्रस्त | रोजंदारी मजूर | होमगार्ड | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्थानिक अनुसूचित जमाती | | | | | | | | | | |

(स्वाक्षरी)

मुख्य वनसंरक्षक (प्रा.) / वनसंरक्षक (प्रा.)

टिप :- वरीलप्रमाणे वनविभागनिहाय माहिती सादर करण्यासोबतच मुख्य वनसंरक्षक (प्रा.) / वनसंरक्षक (प्रा.) यांनी वरील प्रपत्रातच वनवृत्ताचा एकत्रित गोषवारा सादर करावा.

45
53

मंत्रालयीन सेवा
जनहिताय सर्वदा

सत्यमेव जयते

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


# महाराष्ट्र शासन
## महसूल व वन विभाग

४ था मजला, विस्तार इमारत, दालन क्र.४५३,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-
४०००३२

दूरध्वनी क्र. :- ०२२-२२८१३६२३ Email ID :- vinayak.jakhlekar@nic.in


क्रमांक:एफएसटी-०६/२२/प्र.क्र.१२८/फ-४ दिनांक : ३१ जानेवारी, २०२३.

प्रति,

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख),
महाराष्ट्र राज्य, नागपूर

विषय :- वन विभागातील भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) नामनिर्देशनाच्या कोट्यातील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड संवर्गातील पदे सरळसेवेने भरण्याबाबत.

संदर्भ:- १) महसूल व वन विभाग, शा.नि. क्र.एफएसटी-०६/२२/प्रक्र.१२८/फ-४ दि.२७.१२.२०२२ (गट-ब, अराजपत्रित, गट-क व गट- ड बाबत)

२) महसूल व वन विभाग, शा.नि. क्र.एफएसटी-०६/२२/प्रक्र.१२८/फ-४ दि.२७.१२.२०२२ (वनरक्षक बाबत)

३) आपले पत्र क्र.कक्ष-१० (२)/आस्था/एक/प्रक्र.६ (२२-२३)/२७०, दि.४.१.२०२३

आपल्या उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भाधीन क्र.३ येथील दि.४.१.२०२३ रोजीच्या पत्रास अनुलक्षून आपणास खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे:-

| अ. क्र. | पदनाम | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | लघुलेखक (उच्चश्रेणी) (अ.रा., गट-ब) | सर्व संवर्गाच्या बिंदुनामावली प्रमाणित करण्यात आलेल्या आहेत. आपल्या स्तरावरून टीसीएस कंपनीसोबत करार प्रक्रिया सुरु आहे. करार झाल्यानंतर जाहिराती प्रसिध्द करण्यात येऊन भरती प्रक्रिया तातडीने करण्यात यावी. |
| २ | लघुलेखक (निम्नश्रेणी) (अ.रा., गट-ब) | |
| ३ | वरिष्ठ सांख्यिकी सहाय्यक (गट-क) | |
| ४ | कनिष्ठ सांख्यिकी सहाय्यक (गट-क) | |
| ५ | लेखापाल (गट-क) | |
| ६ | शिपाई (गट-ड) | |
| ७ | वनरक्षक (गट-क) | मा.राज्यपाल यांच्या दि.२९.०८.२०१९ च्या अधिसूचनेनुसार अनुसूचित क्षेत्रातील वनरक्षक व सर्व्हेक्षक पदे भरण्यासंदर्भात |
| ८ | सर्व्हेक्षक (गट-क) | |

| अ. क्र. | पदनाम | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| | | सामान्य प्रशासन विभागाकडून धोरणात्मक निर्णय होण्याच्या अनुषंगाने मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव विचाराधीन आहे. त्यामुळे तूर्तास अनुसूचित क्षेत्रातील वनरक्षक व सर्व्हेक्षक संवर्गातील पदे वगळता इतर ठिकाणची पदे भरण्याची कार्यवाही तातडीने करण्यात यावी. |
| ९ | कनिष्ठ अभियंता गट-ब (अराजपत्रित) | यापूर्वी या संवर्गाची भरती सा.बां.वि.च्या दि.०१.०१.१९९८ च्या सेवाप्रवेश नियमानुसार करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर सेवाप्रवेश नियमाच्या आधारे भरतीप्रक्रिया राबविण्यात यावी. |
| १० | ट्रक चालक गट-क | सामान्य प्रशासन विभागाच्या वाहनचालक संवर्गाच्या दि.२/३/२०१७ रोजीच्या सेवाप्रवेश नियमानुसार भरतीप्रक्रिया राबविण्यात यावी. तथापि उमेदवाराने जड प्रवासी वाहन चालविण्याचा परवाना सुध्दा धारण करणे आवश्यक असल्याचे अनिवार्य करण्यात यावे. |
| ११ | गृह प्रमुख गट-क | या संवर्गाची भरती आतापर्यंत ज्या आधारे केली जात आहे, त्या आधारे भरती प्रक्रिया राबविण्यात यावी. |
| १२ | लॉंच चालक गट-क | |
| १३ | ग्रंथालय परिचर गट-क | |
| १४ | पशु परिचर गट-क | |
| १५ | खलाशी गट-ड | |
| १६ | पहारेकरी गट-ड | |
| १७ | सहाय्यक स्वयंपाकी गट-ड | |
| १८ | चेनमन गट-ड (पद रिक्त नाही) | |
| १९ | नौका तांडेल गट-ड (पद रिक्त नाही) | |
| २० | माहुत गट-क | माहुत व चारा कापणारा या संवर्गाचे वन विभागाचे स्वतंत्र सेवाप्रवेश नियम नाहीत. या पदाच्या सेवाप्रवेश नियमास मान्यता प्राप्त करण्याच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागास एकत्रित प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. हे सेवाप्रवेश नियम अंतिम झाल्यानंतर भरतीप्रक्रिया राबविण्यात यावी. |
| २१ | चारा कापणारा गट-ड | |
| २२ | शारीरिक प्रशिक्षण ड्रील शिक्षक गट-क | या संवर्गाचे अधिसूचित सेवाप्रवेश नियम नाहीत. शारीरिक प्रशिक्षण ड्रील शिक्षक, कवायत शिक्षक, बिनतारी संदेश चालक, बिनतारी तंत्रज्ञ, या पदांचे सेवाप्रवेश नियम |
| २३ | बिनतारी संदेश चालक गट-क | |

| अ. क्र. | पदनाम | करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| २४ | बिनतारी तंत्रज्ञ गट-क | प्रशासन विभागास सादर करण्यात आले आहेत. हे सेवाप्रवेश नियम अंतिम झाल्यानंतर भरतीप्रक्रिया राबविण्यात यावी. तांडेल या संवर्गाचे १ पद सेवाप्रवेश नियम अंतिम झाल्यानंतर भरण्यात यावे. |
| २५ | तांडेल गट-ड | |
| २६ | कवायत शिक्षक गट-क | |
| २७ | मास्क लश्कर गट-ड | |
| २८ | देखभाल सेवक गट-ड | |
| उपरोक्त अ.क्र.१ ते १९ येथील नमुद संवर्गांच्या पदांची भरतीप्रक्रिया तातडीने राबविण्यात यावी. तसेच ज्या संवर्गाचे सेवाप्रवेश नियम अद्याप शासनास सादर करण्यात आलेले नाहीत, अशा सर्व संवर्गाचे सेवाप्रवेश नियम सामान्य प्रशासन विभागाच्या आदर्श नमुन्यानुसार तयार करुन ते अंतिम करण्याच्या दृष्टीने शासनास तात्काळ सादर करावेत. | | |

(सुनिल पांढरे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), महाराष्ट्र राज्य, नागपूर